## देवीचे गाणे

जगत् जननी देवी, आई दर्शन देई ॥
दुर्गा, गौरी, महालक्ष्मी
तूच रेणूका, मायभवानी
भाव मनीचे घे तु जाणूनी
कृपा असु दे तुझी आम्हांवरी ॥१॥

सप्तसूरांचा साज लेवूनी
नवरसांचीही पखरण करूनी
गीत सुमनांची माळ गुंफूनी
तुझीया स्तवने आले मंदीरी ॥२॥

तुझ्या भेटीची आस लागली
दर्शनास मन व्याकुळ होई
तेजःपुंज तव रूप पाहूनी
दिव्यत्वाची प्रचिती येई ॥३॥

ब्रह्मचारिणी, शैलपुत्री,
महागौरी, सिध्दीदात्री
धन्य झाले तुझ्या दर्शने
जगन्माता आई भेटली ॥४॥



सौ. प्रिती लकडे
औंध पुणे